जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४०          दिनांक - १७/०६/२०२३**

**लोणीकाळभोर पोलीस स्टेशन,पुणे शहर**

## लोणीकाळभोर पोलीस स्टेशनचे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार योगेश शांताराम लोंढे यास पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर व पुणे जिल्हयातुन दोन वर्षा करीता तडीपार

लोणीकाळभोर पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील गुन्हेगार यांना चेक करुन त्यांचेवर कारवाई करणे बाबतच्या सुचना वजा आदेश श्री.दत्तात्रय चव्हाण,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकाळभोर पोलीस स्टेशन,पुणे शहर यांनी पोलीस स्टेशनचे सर्व्हेलन्स अधिकारी पोउपनिरी धायगुडे,पोउपनि हंबीर,पोहवा सातपुते पोना धनवटे व भोसले यांना दिले.त्यानुसार अभिलेखावरील गुन्हेगारांचा शोध घेतला असता रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार नामे **योगेश शांताराम लोंढे,वय ३० वर्षे,रा.कुंजीरवाडी माळवाडी,ता.हवेली जि.पुणे.हा** गुंड साथिदारांसह कुंजीरवाडी,म्हातोबाची आळंदी,नायगाव फाटा,पुणे सोलापुर रोड परिसरात लोणीकाळभोर पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात वारंवार गुन्हे करीत असतो.त्याची सर्वसामान्य जनतेमध्ये घबराहट,भिती व मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.त्याचे गुंड व दहशती कृत्यामुळे व तो सतत आपले गुंड सदस्यांसह गुन्हे करीत असलेने त्यांचेविरुध्द नागरीक तक्रार देण्यासाठी पुढे येत नाहीत. अशी माहिती मिळाली.

सदर माहितीचे आधारे श्री.दत्तात्रय चव्हाण,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकाळभोर पोलीस स्टेशन,पुणे शहर यांनी **योगेश शांताराम लोंढे, वय ३० वर्षे,रा.कुंजीरवाडी माळवाडी,ता.हवेली जि.पुणे** याचे तडीपारीचा प्रस्ताव तयार करुन मा.पोलीस उपायुक्त परि. ०५, पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख, यांचेकडे पाठविला होता. मा.पोलीस उपायुक्त परि.५,पुणे शहर यांनी सदरचे प्रस्तावाची पडताळणी करुन दिनांक १६/०६/२०२३ रोजी त्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६(१)(अ)(ब) प्रमाणे पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे जिल्हयातुन २ वर्षाकरिता तडीपार करण्याचा आदेश पारित केला आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशीक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उपआयुक्त परि.०५,पुणे शहर,श्री.विक्रांत देशमुख, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर अश्विनी राख,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.दत्तात्रय चव्हाण,पोलीस निरीक्षक, (गुन्हे) श्री.सुभाष काळे, पोउपनिरी किरण धायगुडे, पोलीस हवालदार गणेश सातपुते, पोलीस नाईक संदिप धनवटे,पोलीस नाईक भोसले यांनी केली आहे.